रजि. नं. एस.ए.टी. / माण/बी.एन.के./ओ./११९, सन १९९६
दि. ३१/१०/९६, एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी.

# माणदेशी

# महिला सहकारी बँक लि., म्हसवड

ता. माण, जि. सातारा.



**१४ वा**

**वार्षिक अहवाल**

सन २०१०-२०११

ऑडीट वर्ग 'अ'

# संचालक मंडळ (२००६-०७ ते २०१०-११)

माण देशी बँक



श्रीमती चेतना वि. सिन्हा
अध्यक्षा (म्हसवड)



सौ. मंजुषा रा. सुर्यवंशी
उपाध्यक्षा (म्हसवड)



सौ. सुलेखा शि. शिंदे
संचालिका (म्हसवड)



सौ. गीता ग. रसाळ
संचालिका (म्हसवड)



सौ. मोनिका अ. व्होरा
संचालिका (म्हसवड)



सौ. दिपा ज. माने
संचालिका (वर-मलवडी)



सौ. स्वाती नि. चिंचकर
संचालिका (म्हसवड)



सौ. निर्मला म. मोरे
संचालिका (गोंदवले खुर्द)



सौ. संगिता गि. कट्टे
संचालिका (गोंदवले बु।।)



सौ. वैशाली सु. शहा
संचालिका (वडूज)



सौ. वर्षा ल. खाडे
संचालिका (पळशी)



सौ. सुभद्रा श्री. झिंमल
संचालिका (गंगोती)



सौ. संगिता म. काटकर
संचालिका (कुकुडवाड)



सौ. रुपाली सु. सोनवणे
संचालिका (म्हसवड)



सौ. विमल दि. घुटुकडे
संचालिका (विरळी)



सौ. ललीता सा. पोळ
संचालिका (देवापूर)



सौ. सिताबाई आ. पुकळे
संचालिका (पुकळेवाडी)



श्रीमती शकुंतला भु. नलवडे
संचालिका (बोथे)



सौ. राणी सं. गोरड
संचालिका (दिडवाघवाडी)



श्री. काशीनाथ द. राऊत
तज्ञ संचालक (गोंदवले बु।।)



श्री. विजयकुमार केसकर
तज्ञ संचालक (गोंदवले बु।।)



सौ. रेखा सु. कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी

# संचालक मंडळ (सन २०११-१२ ते २०१६-१७)



श्रीमती चेतना वि. सिन्हा
संचालिका (म्हसवड)



सौ. मंजुषा रा. सुर्यवंशी
संचालिका (म्हसवड)

माण देशी बँक



सौ. गीता ग. रसाळ
संचालिका (म्हसवड)



सौ. स्वाती नि. चिंचकर
संचालिका (म्हसवड)



सौ.राजश्री नि. दोशी
संचालिका (म्हसवड)



सौ. वनिता जा. पिसे
संचालिका (म्हसवड)



सौ. ललीता सा. पोळ
संचालिका (देवापूर)



सौ. निर्मला म. मोरे
संचालिका (गोंदवले खुर्द)



सौ. संगिता म. काटकर
संचालिका (कुकुडवाड)



सौ. राणी सं. गोरड
संचालिका (दिडवाघवाडी)



सौ. वर्षा ल. खाडे
संचालिका (पळशी)



सौ. शारदा बा. मदने
संचालिका (बनगरवाडी)



सौ. सिताबाई आ. पुकळे
संचालिका (पुकळेवाडी)



सौ. रेखा अशोक कट्टे
संचालिका (गोंदवले बु.)



सौ. नूतन प्र. शेटे
संचालिका (वडूज)



सौ. कांचन कि. शिंदे
संचालिका (बोथे)



सौ. विमल दि. घुटुकडे
संचालिका (विरळी)



सौ. स्नेहलता बा. आटपाडकर
संचालिका (वर-मलवडी)



सौ. अरूणा अ. सावंत
संचालिका (क्षेत्र माहुली)



श्री. काशीनाथ द. राऊत
तज्ञ संचालक (गोंदवले बु।।)



श्री. विजयकुमार केसकर
तज्ञ संचालक (गोंदवले बु।।)



सौ. रेखा सु. कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी



मा. ना. श्री. पृथ्वीराज चव्हाण, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांच्याशी बँकेच्या कार्याविषयी चर्चा करताना बँकेच्या अध्यक्षा श्रीमती चेतना सिन्हा, सोबत मा. श्री. बाळासाहेब थोरात, महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य.



''माणदेशी चॉम्पियन क्रीडासंकुलाचे'' उद्घाटनप्रसंगी माण-खटाव तालुक्याचे मा. आमदार जयकुमार गोरे (भाऊ) व फौंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती चेतना सिन्हा सोबत मा. श्री. व्ही. व्ही. करमरकर साहेब, क्रिडासमिक्षक, मा. प्राध्यापक व सामाजिक कर्यकर्त्या श्रीमती शमा दलवाई, मा. श्री. अशोक म्हापुस्कर, व्हॉलीबॉल छत्रपती पुरस्कार खेळाडू व मा. श्री. बाळ वाडवलीकर, आरसीएफ माजी क्रिडाधिकारी, बँकेचे मा. संचालक मंडळ व इतर.

दि. १७ जून २०११ रोजी श्रीमंत ना. रामराजे नाईक निंबाळकर, जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी माणदेशी बँकेस भेट दिली, त्यावेळी माणदेशी बँकेच्या व फौंडेशनच्या कार्याची माहिती देताना बँकेच्या अध्यक्षा श्रीमती चेतना सिन्हा. त्याप्रसंगी मा. श्री. प्रभाकर घार्गे, आमदार, विधानपरिषद, मा. श्री. विलासबापू वाठारकर, चेअरमन, सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि., मा. श्री. दादाराजे खर्डेकर माजी चेअरमन सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि., मा. श्री. सदाशिवराव पोळ मा. आमदार, मा. श्री. शिवाजीराव शिंदे अध्यक्ष माण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस, मा. श्री. युवराज सुर्यवंशी नगरसेवक म्हसवड नगरपालिका व मा. श्री. अजितराव राजेमाने मा. नगराध्यक्ष, मा. श्री. अनिल देसाई संचालक सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,



# १४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, आपल्या बँकेची चौदावी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. १४।९।२०११ रोजी दुपारी १ वाजता माणदेशी महिला सह. बँक लि. म्हसवड येथे खालील विषयावर विचार विनिमय करणेसाठी होणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

## • सभेपुढील विषय •

१. मागील दिनांक ११ -८-२०१० रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०११ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३. सन २०१०-२०११ मधील नफ्याची मा. संचालक मंडळाने सुचविलेनुसार नफा वाटणीस मंजुरी देणे.
४. सन २०१०-२०११ चे शासकिय लेखापरिक्षण अहवाल वाचून नोंद घेणे.
५. सन २०११ - २०१२ या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत हिशोब तपासणीसाची नेमणूक करणे व त्याचे मानधन ठरविणे.
६. सन २०११ - २०१२ सालाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०१०- २०११ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा ज्या बाबीवर अधिक खर्च झाला आहे. त्यास मान्यता देणे.
७. संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत चर्चा करणे.
८. पोट नियम दुरुस्तीबाबत चर्चा करणे.
९. माणदेशी महिला सह. बँकेतर्फे लघुपत पुरवठा केला जातो, त्याबाबत चर्चा करणे.
१०. माणदेशी महिला सहकारी बँक व माणदेशी फौऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेल्या उपक्रमांची चर्चा करुन नोंद घेणे.
११. शाखा विस्तारास मान्यता देणे .
१२. मा. अध्यक्षांच्या पुर्वपरवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर विचार करणे.

संचालक मंडळाच्या हुकुमावरुन
**माणदेशी महिला सह. बँक लि. म्हसवड**

दि. ३०/८/२०११
स्थळ :- श्रीमती आनंदीबाई रतनचंद दोशी सांस्कृतिक भवन, म्हसवड
वेळ: दुपारी १ वा.

**सौ. रेखा सु. कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी
माणदेशी महिला सह. बँक लि. म्हसवड

विशेष सुचना :-
१. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासांनंतर सभा घेणेत येईल.
२. सभेच्या वेळी विचारावयाचे प्रश्न आणि सुचना दि. ७/९/२०११ पूर्वी बँकेच्या कार्यालयात मिळतील अशा रितीने पाठवाव्यात.

**सन्माननीय सभासद भगिनींनो,**

माणदेशी महिला सहकारी बँकेने १५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. या वर्षाचा अहवाल सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. बँकेच्या सुरुवातीपासूनच माण खटावमधील जनतेकडून बँकेस सहकार्य मिळत आहे व २००९-१० मध्ये बँकेने सातारा शहर आणि लोणंद शहर येथे आणखी दोन शाखा काढल्या व तिथेही आपल्याला जनतेकडून भरघोस प्रतिसाद मिळाला. शाखांच्या ठेवीमध्ये ५०% पेक्षा अधिक वाढ झाली.

माणदेशीच्या स्थापनेपासून आतापर्यंत सुमारे १,४०,३६० ग्राहकांना माणदेशीने आर्थिक सुविधा व व्यवसायप्रशिक्षण दिले आहे. ह्यावर्षी माणदेशी फौंडेशनच्या व्यवसाय प्रशिक्षण शाळेच्या सातारा व हुबळी येथे शाखा काढल्या. व्यवसाय शाळेअंतर्गत चालू केलेल्या हजारो देशी उद्योजिका या कार्यक्रमामध्ये मोठ्या संख्येने महिला उद्योजिका सहभागी होवून कार्यशाळांचा फायदा घेत आहेत व आपला व्यवसाय यशस्वी करीत आहेत. या कार्यक्रमामुळे महिलांच्या व्यवसायाची व मालाची जाहिरात होवून त्यांना मोठ्या प्रमाणावर बाजारपेठ उपलब्ध होवू लागली आहे. हजार देशी उद्योजिकेचे रुपांतर पाच हजार महिलांमध्ये करुन भविष्यात महिलांचे "चेंबर ऑफ कॉमर्स" काढण्याचा माणदेशीचा मानस आहे.

अहवाल सादर करण्याच्या निमित्ताने मला सातारा जिल्ह्यातील जनतेशी संवाद साधण्यास मिळाला ही भाग्याची गोष्ट आहे. मी आपल्याला सांगू इच्छिते की, ६ नोव्हेंबर २०१० रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांची मुंबई येथे "उद्योजक परिषद" भरविली होती. त्यामध्ये माणदेशी बँक व फौंडेशन करीत असलेल्या सामाजिक कार्याची दखल म्हणून माणदेशीला निमंत्रित केले गेले होते. तेथे मला मा. श्री. ओबामा यांच्याबरोबर माणदेशी बँक व फौंडेशन राबवित असलेल्या कार्याची माहिती देणेची संधी मिळाली. माणदेशीच्या कार्यास प्रेरित होवून त्यानंतर २ मार्च,२०११ रोजी श्री. ओबामा यांनी श्रीमती लायल ब्रेनार्ड, युएस ट्रेझरी अंडरसेक्रेटरी, श्री. कक्कानी, ज्येष्ठ सल्लागार अर्थखाते व त्यांचे सहकारीवर्ग यांना माणदेशी बँकेस भेट देण्यास पाठविले. श्रीमती लायल व त्यांच्या सहकार्यांनी माणदेशीस प्रत्यक्षात भेट देवून कार्याची पाहणी केली व अमेरिकेतील ग्रामीण भागात या कार्याचा समावेश करण्याची इच्छा व्यक्त करुन दाखवली. ही माणदेशीच्या सभासद व ग्राहकवर्गासाठी अभिमानाची बाब आहे.

माणदेशी तरंग वाहिनी(कम्युनिटी रेडिओ स्टेशन) बरोबर आणखी एक माणदेशीने उचललेले पाऊल म्हणजे "माणदेशी चॅम्पियन" (क्रिडासंकुल) ची स्थापना. ग्रामीण भागातील मुली व मुलांना खेळाचे उच्च दर्जाचे प्रशिक्षण मिळावे त्यातून आंतरराष्ट्रीय पातळीचे खेळाडू तयार व्हावेत या उद्देशाने हा दुर्मिळ उपक्रम चालू केलेला आहे. ह्या उपक्रमामुळे मुली-मुलांचा मानसिक, शारिरीक विकास तर होईलच पण त्यांच्यामध्ये प्रचंड आत्मविश्वास आणि धिटाई निर्माण होणार आहे जेणेकरुन ते सर्वच क्षेत्रात प्राविण्य मिळवू शकतील. एकंदर माणदेशीने ही मुलांच्या भविष्यासाठी केलेली अमुल्य गुंतवणूक आहे.

सध्या आधुनिक तंत्रज्ञान जसे संगणक, टी.व्ही., मोबाईल, रेडिओचा वापर करुन जनतेला आर्थिक व व्यावसायिक प्रशिक्षण त्यांच्या दारी देण्याचे कार्य माणदेशी करत आहे. व्यवसाय शाळेद्वारे ३४००० महिलांनी व्यवसाय प्रशिक्षण घेतले आहे.

महिलांच्या नावावर ''सात-बारा'' चा उत्तारा व आठ अ चा उतारा असावा हा विषय नेहमीच माणदेशीच्या कार्यक्रमामध्ये अग्रस्तरावर राहिलेला आहे. त्याचाच भाग म्हणून माणदेशीने ''अमेरिका स्थित अशोका'' या संस्थेबरोबर भागीदारी करुन अल्प उत्पन्न गटातील महिलांसाठी घरबांधणीचा उपक्रम हाती घेतलेला आहे. ह्या उपक्रमाद्वारे माणदेशीच्या महिलांना निवाऱ्याची सोय होणार आहे. माणदेशी बँकेद्वारे एक टक्का सुट देवून ''गृहकर्ज वाटप'' करण्यात येणार आहे.
आपल्या महिलांना विनातारण कर्जाची सोय उपलब्ध करुन द्यावी याकरीता माणदेशीने ह्यावर्षीपासून ग्रामीण मॉडेल म्हणजे ''जॉईट लायबिलिटी ग्रुप'' कर्ज योजना चालू केलेली आहे. तसेच शेतकऱ्यांचा ''आर्थिक चढ-उतार'' लक्षात घेता त्यांना आपल्या मालांची साठवणूक करता यावी व चांगल्या दराने वा भावाने माल विकता यावा यासाठी भविष्यात ''धान्याचे कोठार'' (वेअर हाऊस) काढण्याची माणदेशीची कल्पना आहे.

जागतिक पातळीवर आपल्या कार्याचे कौतूक करवून घेण्यासाठी माणदेशी महिला सह. बँकेच्या सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार, व कर्जदारांनी आपले जे अनमोल योगदान दिले अशाच सहकार्याची अपेक्षा आजसुद्धा बँकेला आपल्या सर्व खातेदारांकडून आहे. हे सहकार्य बँकेला सतत लाभत राहून बँक जागतिक पातळीवर आपला शिक्का मोर्तब करणार आहे आपल्याच सहकार्यातून. भविष्यात महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यात माणदेशीचे कार्य विस्तारण्या बरोबरच कर्नाटक राज्यातील महिलांना माणदेशी बँकेचे उपक्रम देण्याबाबत माणदेशीचा माणस आहे.

आपली स्नेहांकित,
**श्रीमती चेतना सिन्हा, अध्यक्षा**

# चालू वर्षातील घडामोडी

## माणदेशी महिला बँकेस उद्योजक परिषदेसाठी निमंत्रण

## अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्याशी भेट

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांची मुंबई येथील हॉटेल ट्रायडेन्टमध्ये ६ नोव्हेंबर २०१० रोजी दुपारी ४ वाजता निवडक व्यवसायिक व उद्योगपती यांचेबरोबर परिषद भरवली गेली होती. त्या परिषदेमध्ये महिन्द्रा कंपनीचे आनंद महिन्द्रा, पिरामल कंपनीचे अशोक पिरामल, जनरल इलेक्ट्रिकलचे सी.इ.ओ. व ओबामांचे वाणिज्य सल्लागार तसेच आंतरराष्ट्रीय विकास संदर्भातील सल्लागार, कॉमर्स मिनीस्टर श्री. राज शहा व इतर प्रतीनिधी असा २० जणांचा समावेश होता. या उद्योजक परिषदेसाठी माणदेशी महिला बँकेच्या अध्यक्षा श्रीमती चेतना सिन्हा यांना आमंत्रित केले गेले होते. मिटींगचा मुख्य विषय होता ''भारत आणि अमेरिकेतील व्यवसाय वाढ व रोजगार निर्मिती'' ज्या मध्ये श्रीमती चेतना सिन्हा यांना आपले मत मांडणेची अविस्मरणीय संधी मिळाली. ज्यावेळी श्री. ओबामा यांनी सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या उद्योजकांशी चर्चा करण्याची उत्सुकता दाखविली त्यावेळी श्रीमती सिन्हा यांना ''माणदेशी महिला बँकेच्या'' कार्यासंदर्भात चर्चा करण्याची संधी मिळाली. माणदेशी बँकेबद्दल सांगताना श्रीमती सिन्हा म्हणाल्या, माणदेशी बँक हि ग्रामीण भागातल्या महिलांना छोट्या बचतीतून कर्ज देण्याची सोय देते. ओबामांनी त्यांना विचारले, महिला बँक बचत पुरुषांकडून घेते व कर्ज देताना महिलांनाच का देते? त्यावर उत्तर देताना श्रीमती सिन्हा म्हणाल्या, ''महिलांच्या हातात ज्यावेळी पैसा येतो तेव्हा ते पैसे त्या कुटुंब व व्यवसायासाठी खर्च करतात, पण पुरुषाच्या बाबतीत नेहमीच असे घडत नाही. महिला कर्जाच्या पैशाचा विनियोग चतूरपणाने करतात. ह्या गोष्टीचा अनुभव अमेरिकेला २ वर्षाआधीच मिळाला आहे. जर अमेरिकेची वित्तीय संस्था महिलांच्या हातात असत्या तर त्यांना आर्थिक संकटास सामोरे जायला लागले नसते.'' हे ऐकल्यानंर श्री. ओबामा हसून म्हणाले, माझी बायको मिशेल देखील असेच म्हणते. माणदेशीचा ''शाळकरी मुलींना सायकल वाटप करणे'' ह्या उपक्रमाची श्री. ओबामा यांनी प्रशंसा केली व माझ्या मुलींना हा सायकल वाटप कार्यक्रम नक्की आवडेल असे सांगितले. यासर्व चर्चेमध्ये सोलर कंपनीचे हरीश हांडे, प्रथम संस्थेचे माधव चव्हाण, ब्युटीशिअन शेहनाज हुसेन सामील होते.

**श्रीमती लायल ब्रेनार्ड, युएस ट्रेझरी अंडरसेक्रेटरी, यांची माणदेशी बँक व माणदेशी फौंडेशनला भेट**

दि. ०२ मार्च, २०११ रोजी श्रीमती लायल ब्रेनार्ड, श्री. अनिल कक्कानी, ज्येष्ठ सल्लागार, अर्थखाते व त्यांचे सहकारी यांनी माणदेशी सह. बँक व माणदेशी फौंडेशन ला भेट दिली. ह्या भेटीचा प्रमुख उद्देश होता माणदेशी बँक ग्रामिण भागात कशाप्रकारे आधुनिक पद्धतीने (ई-कार्ड टेक्नॉलॉजीद्वारे) घरपोच सेवा देते हे पहाणे. थोडक्यात माणदेशी बँकेने ग्रामिण भागात चालणाऱ्या भारतीय बँकांचे प्रतिनिधीत्व केले. सुरुवातीला श्रीमती लायल ब्रेनार्ड यांनी माणदेशीचा ग्राहक वर्ग असलेल्या रामनगर, सातारा ह्या गावाला भेट दिली. येथे त्यांनी ''मोबाईल बिझनेस स्कूलला'' भेट देवून माणदेशी उद्योगिनी देत असलेल्या व्यवसायिक प्रशिक्षणासंदर्भात माहिती घेतली. त्यानंतर पाहुण्यांच्या हस्ते गरीब गरजू २० शाळकरी मुलींना मोफत सायकल वाटप करण्यात आले. माणदेशीच्या बचत गटातील महिलांबरोबर सविस्तर चर्चा करुन गावागावांमध्ये माणेदशी राबवित असलेल्या आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमाची माहिती दिली. सातारा भाजी मंडईमध्ये जिथे माणदेशी आपल्या भाजी विक्रेत्या महिलांना

ई-कार्ड सुविधेद्वारे बचत व कर्जाच्या घरपोच सेवा देते अशा महिलांना श्रीमती लायल ब्रेनार्ड यांनी भेट दिली व ई-कार्ड सुविधेचे प्रात्यक्षिक पाहिले. ई-कार्ड डिव्हाईसमध्ये जो डाटा माणदेशीचे प्रतिनिधी कलेक्ट करतात तो डाटा बँकेच्या संगणकामध्ये कशाप्रकारे ट्रान्सफर होतो याचे श्रीमती लायल ब्रेनार्ड व त्यांचे सहकारी यांनी प्रत्यक्षात माणदेशी सह. बँकेस भेट देवून परिक्षण केले. माणदेशीच्या उद्योजिका यांनी लावलेल्या स्टॉलला पाहुण्यांनी भेट दिली व त्या महिलांना आपले अनुभव पाहुण्यांसमोर व्यक्त करणेची संधी मिळाली. सर्वशेवटी माणदेशीसारख्या संस्थांमुळे भारतातील ग्रामीण जीवनाचा कायापालट झाला असल्याचे मत श्रीमती ब्रेनार्ड यांनी व्यक्त केले.

## आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमः-

## आर्थिक पाठबळ, मालमत्ता व ज्ञान ह्यांच्या माध्यमातून महिला सबलीकरण.-

महिलांच्या अनुभवातून शिकणे व त्यानुसार योजना पुरविणे ही माणदेशीची परंपरा. माणदेशीला अनुभवातून लक्षात आले की, महिलानां संपूर्णतः यशस्वी होणेसाठी फक्त आर्थिक पाठबळ देणे पूरेसे नसून त्याबरोबर त्यांच्या स्वतःच्या मालकीचा सात-बारा असणे गरजेचे आहे. तसेच व्यवसाय कौशल्य व कायदेशीर ज्ञानाचे भांडार त्यांना उपलब्ध करुन दिले पाहिजे. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून हा उद्देश माणदेशीने साध्य केला. महिलांना व्यवसायनिगडीत आवश्यक माहिती देवून त्या कशा रितीने व्यवसायामध्ये येणाऱ्या अडी-अडचणींना सामोरे जावू शकतील याचे प्रशिक्षण माणदेशी तीन पायऱ्यांमध्ये राबवित आहे. १४००० पेक्षा जास्त महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेवून आपल्या व्यवसायामध्ये प्रगती केली आहे.

अ) मुलभूत आर्थिक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत महिलांना बचत, कर्ज, पेन्शन व विमा तसेच इतर उपलब्ध असलेल्या बॅंकिंग सुविधांमार्फत माहिती मिळते. हे प्रशिक्षण प्रत्येक महिला जेव्हा पहिल्यांदा कर्ज घेते तेव्हा तिच्यासाठी आवश्यक केले आहे.

ब) जेव्हा महिला दुसऱ्यांदा कर्ज घेते तेव्हा साहजिकच तिचा उद्देश व्यवसाय वाढविणे हा असतो त्यानुसार "ॲडव्हान्स आर्थिक प्रशिक्षण कार्यक्रम" तयार केलेला आहे ज्याद्वारे जास्तीत जास्त व्यवसायानुरुप माहिती दिली जाते. उदा. आर्थिक व्यवस्थापन, व्यवसायामधील चढ-उत्तार, नफा-तोटा, ग्राहक संवाद कौशल्य, बाजारपेठे विषयीची माहिती अशा विविध विषयांवर मार्गदर्शन देणारा हा विशेष स्वरुपाचा प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जातो.

क) "हजारो देशी उद्योजिका" कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या महिलेला रु. १०,००० चे बक्षिस देण्यात येते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांसाठी वर्षभराचा प्रशिक्षण कार्यक्रमाचा आराखडा तयार केलेला आहे. ह्यामध्ये वर्षामध्ये चार कार्यशाळा भरविल्या जातात. ह्या कार्यशाळांमध्ये अनुभवी प्रशिक्षकांना आमंत्रित केले जाते जे महिलांना त्यांच्या व्यवसायासंदर्भात मार्गदर्शन करतात. तज्ञ सल्लागारांना व उद्योजकांना महिलांशी जोडून दिले जाते जेणेकरुन महिला सल्लागारांच्या संपर्कात राहून त्यांच्या व्यवसायाचा आराखडा, व्यवसायाची रचना, नियोजन, नोंदणी आणि कायदेशीररित्या आवश्यक असणाऱ्या बाबी संबंधित माहिती घेवू शकतील. व्यवसायाचे कौशल्य, जमाखर्चाचा हिशोब आदी बाबींची माहिती महिलांना मिळू लागली आहे. व्यवसाय वाढीसाठी अंतर्गत व्यवस्थापन, बाजारपेठ, महिलांच्या व्यवसायासंदर्भात व मालाची पेपरमध्ये जाहिरात करणे, मालाची गुणवत्ता टिकविणे, उत्पादित मालाची विविधता व त्यामधील नाविन्य, संबंधित धंद्यातील जोखीम व भांडवलाची विविधता

आणि बारकावे या बाबत कार्य शाळेत माहिती दिली जाते. तसेच ज्या महिलांनी चारही कार्यशाळामध्ये सहभाग घेवून आपल्या व्यवसायात प्रगती केलेली आहे अशा महिलांना पारितोषिक दिले जाते. हे प्रशिक्षण घेतल्यावर माणदेशीच्या महिलेला ''देशी एमबीए'' चे प्रमाणपत्र मिळते.

## माणदेशी फौंडेशनच्या संयुक्त विद्यमाने राबवित असलेले उपक्रम व नाविन्यपूर्ण भागीदारी: ॲक्शियॉन मायक्रोफायनान्स

आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमाच्या रुपरेषेमध्ये व अभ्यासक्रमामध्ये सुधारणा करणेसाठी आणि अधिक चांगल्याप्रकारे हा कार्यक्रम राबविता यावा यासाठी माणदेशीने ''ॲक्शियॉन मायक्रोफायनान्स'' अमेरिका या संस्थेबरोबर भागीदारी केलेली आहे. या संस्थेच्या संचालक मंडळांनी बँकेस भेट देवून आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमाची माहिती घेतली व ॲक्शियॉन संस्थेचे तज्ञ प्रशिक्षक माणदेशीच्या प्रशिक्षकांना व महिलांना ''आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रम'' तसेच ''देशी एमबीए'' या कार्यक्रमावर प्रशिक्षण देत आहेत.

कॉमनवेल्थ ऑफ लर्निंग, कॅनडा :- घरपोच सेवा हे माणदेशीचे प्रतिक सर्व सोयी महिलांना दारी देण्याची धडपड करणाऱ्या माणदेशीने आपल्या प्रशिक्षण कार्यक्रमाला नाविन्यपूर्ण बनवावे महिलांच्या सोयीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम त्यांना घरबसल्या अथवा कामाच्या ठिकाणी देता यावा यासाठी ''कॉमनवेल्थ ऑफ लर्निंग'' या संस्थेबरोबर भागीदारी करणेची कल्पना २०१० साली उदयास आली. प्रशिक्षण कार्यक्रम ''मोबाईल लर्निंग सेंटर'', व्यवसाय शाळा,रेडिओ स्टेशन,संगणक, टी.व्ही. व मोबाईल फोन याद्वारे राबवून अधिकाधिक लोकांपर्यंत त्याचा प्रसार करावा हा उद्देश आहे.

नाबार्ड (नॅशनल बँक फॉर ॲग्रिकल्चर ॲण्ड रुरल डेव्हलपमेंट):- महिलांना दारिद्रयातून बाहेर काढणेसाठी व व्यवसाय संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून माणदेशीने ''नाबार्ड''या संस्थेबरोबर भागीदारी केली आहे व महिलांना ''एम्ब्रॉयडरी-कसुती वर्क'' चे प्रशिक्षण व मार्केटींगचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

## इंटेलिकेश मायक्रोफायनान्स : जॉईंट लायबिलीटी ग्रुप(जेएलजी):-

माणदेशी बँकेने २०११ सालापासून ''जॉईंट लायबिलीटी ग्रुप'' द्वारे महिलांना कर्ज देण्यास सुरुवात केलेली आहे. जॉईंट लायबिलिटी ग्रुपद्वारे महिलांचे गट स्थापन केले जातात व विनातारण कर्जपुरवठा केला जातो. ह्या मध्ये गटातील प्रत्येक महिला हीच कर्ज परतफेडीसाठी जबाबदार असते व प्रत्येक महिला कर्जाची परतफेड नियमितपणे व्हावी ह्यासाठी एक दुसरीला मदत करते. ह्या उपक्रमाची संपूर्ण कार्यपद्धती व रचना ''इंटेलिकेश मायक्रोफायनान्स'' या संस्थेने माणदेशी बँकेच्या कार्यप्रणालीमध्ये बसविलेली आहे. त्यासाठी इंटेलिकेश संस्थेचे प्रोग्राम डायरेक्टर सहा महिन्यापासून माणदेशी बँकेमध्ये ''जेएलजी मॉडेल'' वर काम करीत आहे.

गृहकर्ज वाटप:- ह्या उपक्रमाद्वारे अल्प उत्पन्न गटातील महिलांना घरबांधणीसाठी कर्ज दिले जाणार आहे. माणदेशी बँकेने माणदेशी फौंडेशनच्या माध्यमातून '' अशोका '' या संस्थेबरोबर भागिदारी केलेली आहे. माणदेशी फौंडेशनने ''अशोका'' अमेरिका या संस्थेबरोबर भागीदारी करुन अल्प उत्पन्न गटातील महिलांना घरबांधणी

करुन देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे व घरासाठी कर्ज माणदेशी बँक उपलब्ध करुन देणार आहे. जवळ जवळ ५०० महिलांनी या उपक्रमामध्ये सहभाग घेतला आहे.

माणदेशी चॅम्पियन:- माणदेशातील ग्रामीण खेळाडूंना आंतरराष्ट्रीय पातळीवर संधी मिळावी यासाठी माणदेशी चॅम्पियन्स हा दुर्मिळउपक्रम माणदेशी फौंडेशनच्या माध्यमातून १७ नोव्हेंबर,२०१० रोजी सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमाद्वारे मुली-मुलांसाठी विविध प्रकारच्या खेळांचे मोफत प्रशिक्षण देण्यात येत आहे. ज्या मध्ये ४०० मिटरची धावपट्टी, बॅडमिंटन, फुटबॉल, हॉलीबॉल, मल्लखांब, खो-खो, लाबंउडी, उंच-उडी, थाळीफेक, थ्रो-बॉल अशा खेळांचा समावेश आहे व खेळाचे संपूर्ण साहित्य उपलब्ध करुन दिले आहे. तसेच अनुभवी तीन प्रशिक्षकांची नेमणूक केली आहे जे दररोज सकाळ संध्याकाळ दोन तास मुली-मुलांना प्रशिक्षण देतात. आठवड्यातुन एकदा तज्ञ क्रिडाशिक्षकामार्फत प्रशिक्षण दिले जाते. सध्या ३०० विद्यार्थी ह्या उपक्रमामध्ये सहभागी होवून प्रशिक्षणाचा लाभ घेत आहे. माणदेशातील तरुण मुली व मुलांचा शारीरिक विकास व्हावा. त्याच्यातील आत्मविश्वास जागृत व्हावा या उद्देशाने माणदेशी फौंडेशनने माणदेशी चॅम्पियन हा उपक्रम सुरु केला आहे.

आर्थिक उलाढाल :- आज माणदेशी महिलांचा प्रचंड विश्वास ही माणदेशी महिला सहकारी बँकेची खरी ठेव आहे. २०१०-११ या आर्थिक वर्षात बँकेच्या या महिलांनी ३३ कोटी ३८ लाख २५ हजार रुपयाच्या ठेवी माणदेशी बँकेत ठेवल्या आहेत. गेल्या वर्षाच्या तुलनेत ठेवीत २२.६६% नी वाढ झाली आहे. २२ कोटी ४० लाख ९९ हजार रुपयाचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. कर्ज वाटपात ५५.३९% नी वाढ झाली आहे. एनपीए चे प्रमाण केवळ २.८७% या वर्षीचा ढोबळ नफा ३९ लाख ३२ हजार रुपये झाला आहे. गेल्या वर्षाच्या नफ्याच्या तुलनेत २३.३८% ने वाढ झाली आहे. बँकेचे भागभांडवल २ कोटी ६० लाख ८ हजार आहे. बँकेचे खेळते भांडवल ३७ कोटी ३३ लाख १५ हजार आहे.

माणदेशी इंटरनशिप प्रोग्राम :- २०१० -११ साली माणदेशी फौंडेशन येथे साईस युनिव्हर्सिटी, अमेरिका, डोएच बँक जर्मनी, आयसीएन बिझनेस स्कूल फ्रान्स, एस पी जैन इन्सिटट्युट मुंबई व इतर विद्यापीठातून जवळ-जवळ १८ विद्यार्थ्यांनी येवून माणदेशीच्या कार्याचा अभ्यास केला.

# १४ वा वार्षिक अहवाल सन २०१०-११

## भागभांडवल :-

बँकेचे अधिकृत भागभांडवल रु. ५ कोटीचे आहे. वर्ष अखेरीस रु. २६००५७५० एवढे जमा झाले आहे. या वर्षात भागभांडवलात रु. ३६६३७०० इतकी वाढ झालेली असून ही वाढ १६.४० % एवढी आहे. वर्षाअखेर एकूण १४४२ नवीन सभासद झाले तसेच मृत्यू राजीनामा इत्यादीमुळे ९३७ सभासद कमी झाले. त्यामुळे वर्षाअखेर एकूण सभासद संख्या ११८७१ झाली आहे.

## गंगाजळी व निधी :-

मागील वर्षाअखेर गंगाजळीसह इतर निधी रु. २१६३३६७.६६ होती अहवाल वर्षात त्यात रु. १९९०५५३.१३ ने वाढ होऊन अहवालवर्षा अखेर गंगाजळी, थकव्याज निधी, राखीव निधीची रक्कम रु. ४१५३९२०.७९ इतकी झाली आहे. या वर्षात वाढीचे शेकडा प्रमाण ९२.०१ % इतके आहे.

## ठेवी व विमा संरक्षण :-

मार्च २०१० च्या ठेवी रु. २७२१५५५०६.२३ लाखावरुन मार्च २०११ अखेर रु. ३३३८२४७०५.२९ एवढ्या झाल्या आहेत ही वाढ रु. ६१६६९१९९.०६ इतकी असून, ठेव वाढीचे प्रमाण २२.६६% आहे. या वाढत्या व बदलत्या स्पर्धेत ठेव वाढी बरोबर नफा क्षमता वाढविणे हे ही महत्वाचे आहे त्यामुळे ठेवीच्या व्याजावरील खर्चाचे प्रमाण विचारात घेता ठेवीवरील व्याज दर कमी करावे लागले तरीही आपण एवढ्या ठेवी गोळा केल्या. सभासदांचा,ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास स्पष्ट आहे सर्व ठेवी डिपॉझिट इन्श्युरन्स आणि क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन अंतर्गत सुरक्षित आहेत. त्यांची दर सहामाही विम्याच्या हप्त्याची रक्कम बँक भरते.

## कर्ज :-

गतवर्षी येणे कर्ज रु.१४४२१३८५१.१७ इतके होते या वर्षी त्या मध्ये रु.७९८८४८९२.५० लाख एवढ्या रकमेची वाढ झालेली आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या परिपत्रकाप्रमाणे योग्य तारणी कर्ज वाटपाबद्दल केलेल्या मार्गदर्शना प्रमाणे कर्जवाटप करणे आवश्यक असलेने,चालू वर्षात आम्ही कर्ज प्रकारात वाढ करुन नविन कल्पना आपल्यापुढे ठेवणार आहोत, स्थानिक लोकांना कर्ज उपलब्ध करुन देण्याची योजना राबविणार आहोत, बँकेचे ठेवीदारांशी, खातेदारांशी, कर्जदारांशी नेहमी सलोख्याचे संबंध असावेत म्हणुन त्यात आम्ही नेहमी भर घालतो.

## अग्रक्रम क्षेत्रात कर्ज :-

भारतीय रिझर्व बँक धोरणाप्रमाणे एकूण कर्जाच्या ६०% कर्ज अग्रक्रम क्षेत्रास असावे. आपल्या बँकेत २०१०-२०११ सालात सुद्धा अग्रक्रम क्षेत्रास ९३.३८% कर्जवाटप केलेले आहे. ही आपली अभिमानाची बाब आहे. तसेच दुर्बल घटकांना सुद्धा ८९.५३% कर्जवाटप केले आहे.

## थकबाकी व कर्जवसुली :-

बँकेच्या आर्थिक उन्नतीमध्ये कर्जवाटप व त्यावरील व्याजाची व हप्त्यांची परिणामकारक वसुलीचा फार मोठा वाटा आहे. त्या दृष्टिने बँकेने सतत पाठपुरवठा केल्यामुळे अहवाल वर्षात थकबाकी चे प्रमाण नियंत्रीत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे थकबाकीचे प्रमाण ४.०२% इतके आहे व वसुली ९५.९८% झाली आहे. व NPA २.८७% आहे.

## संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे :-

एकाही संचालकाकडे बँकेचे कर्ज नाही.

## नफा वाटणी :-

या वर्षाच्या नफ्याची वाटणी खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| चालू सालचा नफा रु. | | १८१५९००.०९ |
| राखीव निधी | २५% | ४५३९७५.०२ |
| इमारत निधी | ५०% | ९०७९५०.०५ |
| संशयीत बुडीत कर्ज निधी | २५% | ४५३९७५.०२ |
| एकूण | १०० % | १८१५९००.०९ |

## शाखा विस्तार :-

बँकेला सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, पुणे, कोल्हापूर व रायगड या सात जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्राची मान्यता मिळालेली आहे. भविष्यात बँक या सात जिल्ह्यांत शाखांचे विस्तारीकरण करणार आहे. बँक शाखा विस्तारासाठी RBI ला प्रस्ताव पाठविणार आहे.

## सभासदांची वर्गवारी:-

महाराष्ट्रातील मागासवर्गीय महिलांना एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देणारी आपली पहिलीच महिला बँक आहे.

१) मागासवर्गीय - २३% २) ओ.बी.सी. - २६%
३) एन्. टी. ३०% ४) ओपन - २१%

प्रशिक्षण :- बँकेच्या सेवकांना सन २०१०-११ या कालावधीत विमा प्रशिक्षण, रिकव्हरी, १०१ प्रकरणे, वसुली, सोने तारण, ग्राहकसेवा, कर्ज वाटप व वसुली या विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले.

## गुंतवणूक:-

बँकेने दि. ३१/३/२०११ या वर्षात रु. ८३९६०७३१.०० इतकी गुंतवणूक केलेली आहे. सरकारी रोखेमध्ये गुंतवणूक ६३५५३७५३.०० व इतर बँकेमध्ये २०४०६९७८.०० गुंतवणूक केलेली आहे.

## सोनेतारण कर्ज :-

बँकेने दि. ११/८/१९९७ पासून सोनेतारण कर्ज योजना बँकेच्या सर्व शाखांमध्ये सुरु केलेली असून सदर योजनेतून एकूण २६३ लाख ८१ हजार रुपये इतके कर्जवाटप करणेत आले आहे.

## महिला बचत गट :-

चालू वर्षात २४०० बचत गटाची स्थापना केली आहे. बचत गटाचे एकूण ४८००० हुन अधिक सभासद आहेत. आठवडा बाजार करणाऱ्या महिलांचेही बचत गट केलेले आहेत.

## अंतर्गत तपासणी -

बँकेचे ३१/३/ २०११ अखेर संपणाऱ्या सहकारी वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षण मे. जाधव तानाजीराव आणि कं.चार्टर्ड अकौटंटस् कराड यांनी केले असुन त्यांनी बँकेस बहुमोल सुचना व मार्गदर्शन केले आहे.

## श्रद्धाजंली :-

अहवाल सालात बँकेचे जे ज्ञात, अज्ञात सभासद, ग्राहक, ठेवीदार, हितचिंतक, मुंबई बॉम्बस्फोटातील आपदग्रस्त राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय किर्तीच्या ज्या थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या तसेच देशाच्या सीमारक्षणासाठी ज्या शूर जवानांनी आत्मबलिदान केले त्यांचे पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली.
माणदेशी बँकेचे शुभचिंतक कै. प्रभाकर जाधव(आर. सी. काका) यांचे दि. १६ मार्च २०११ रोजी व कै. तात्यासाहेब पोळ(आप्पा) (जिल्हा खरेदी-विक्री संघ सातारा माजी चेअरमन) यांचे दि. १ मार्च २०११ रोजी निधन झाले त्यांना माणदेशी महिला बँक व माणदेशी फौडेंशन या परिवारातर्फे श्रद्धांजली.



# लेखापरीक्षण अहवाल

आम्ही *माणदेशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड* या बँकेचा दिनांक ३१।०३।२०११ अखेरचा एकत्रित ताळेबंद व त्या दिवशी संपणाऱ्या आर्थिक वर्षाचे एकत्रित नफा तोटा पत्रकांचे लेखापरीक्षण केलेले आहे. सदरची आर्थिक पत्रके ही बँकेच्या व्यवस्थापनाने बनविलेली असून ती त्यांची जबाबदारी आहे. सदर आर्थिक पत्रकाच्या लेखापरिक्षणावरुन त्यावर अभिप्राय व्यक्त करणे यापुरतीच आमची जबाबदारी आहे.

भारतामध्ये सर्वसामान्यतः स्विकारलेल्या व प्रचलित असलेल्या लेखापरीक्षा प्रमाणकानुसार आम्ही लेखापरीक्षण पूर्ण केले आहे. सदर लेखापरीक्षण प्रमाणकांनूसार सदर आर्थिक पत्रकामध्ये गंभीर स्वरुपाच्या उणीवा नसल्याची खात्री होण्याच्या दृष्टीकोनातून नियोजन केलेले असते. लेखापरीक्षणामध्ये आर्थिक पत्रकामधील रकमा व तपशील ज्या पुराव्यावर आधारित आहेत, त्याची चाचणी पद्धतीने तपासणी केली जाते. त्याच प्रमाणे लेखापरीक्षणामध्ये व्यवस्थापनाने स्विकारलेली मूलभूत हिशोबी तत्वे, केलेल्या मुख्य अपेक्षित तरतूदी आणि आर्थिक पत्रकांच्या मांडणीच्या अवलोकनाचा समावेश असतो. लेखापरीक्षण अहवालातील मतप्रर्दशनाला आम्ही केलेल्या लेखापरीक्षणाचा पुरेसा आधार आहे. अशी आमची खात्री आहे. यावरुन आम्ही अहवाल करतो की,-

सदर बँकेचे प्रधान कार्यालय व ६ शाखा यांचे लेखापरीक्षण आम्ही केले आहे.

१) आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमचे संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे आम्हांस उपलब्ध झाले असुन ती सर्व माहिती व खुलासे समाधनकारक आहेत.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरुन बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व त्या खालील नियम व पोटनियमाने अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवलेली आहेत.

३) आमचे मते एकत्रित ताळेबंद बँकिग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ (ॲज ॲपलिकेबल टू को-ऑफ सोसायटीज) चे तिसऱ्या परिशिष्ठातील नमुन्याप्रमाणे कर्ज या खात्यातील पोटकलमातील माहितीसह रिझर्व्ह बँक ऑफ इडियाच्या नियमानुसार तयार करण्यात आला आहे.

४) आम्ही तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक बँकेच्या हिशोबाच्या पुस्तकाशी व विवरणाशी जुळत आहे.

५) आमच्या निरिक्षणात आलेले बँकेचे व्यवहार हे बँकेच्या अखत्यारितील आहेत.

६) आमच्या मते आणि संपूर्ण माहितीप्रमाणे तसेच आम्हाला प्राप्त झालेल्या सर्व शाखांच्या हिशोब पत्रकानुसार तसेच आम्हास देण्यात आलेल्या खुलाशावरुन हे हिशेब महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक ती माहीती देतात. आमच्या लेखापरीक्षण अहवाल भाग 'अ', 'ब' 'क' व परिशिष्ठ यामध्ये नमूद केलेल्या अवलोकनास अनुसरुन

(अ) ताळेबंद पत्रकाबाबत दिनांक ३१ मार्च २०११ या दिवशी बँकेच्या आर्थिक परिस्थितीची व

(ब) नफा-तोटा पत्रकांचे बाबतीत, त्या दिनांकास संपणाऱ्या आर्थिक वर्षाच्या नफ्याची सत्य व रास्त स्थिती दर्शविते.

सन २०१०-११ या वर्षासाठी महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा १९६० खालील नियमानुसार बँकेस 'अ' वर्ग देण्यात येत आहे.

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : २० जुलै २०११

पी. एम. बेकनाळकर ॲण्ड कंपनी,
चार्टर्ड अकौटंट, कोल्हापूर

## परिशिष्ठ अ

बँकेचे नांव :- माणदेशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड

मुख्य कार्यालयाचा पत्ता :- मु. पो. म्हसवड ता. माण जि. सातारा पिन नं. ४१५५०९

नोंदणी तारीख व नोंदणी क्रमांक :- एस. ए. टी./ एम.ए.एन./बी.एन.के./ओ/११९/सन १९९६ दि. ३१/१०/१९९६

रिझर्व बँक परवाना नंबर तारीख :- एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१,२७/१/१९९७

कार्यक्षेत्र :- सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, रायगड, पुणे, कोल्हापूर जिल्हा

| तपशील ३१/३/२०११ | | रक्कम |
|---|---|---|
| मुख्य कार्यालय | म्हसवड | |
| सभासद | I) अ वर्ग | ११८७१ |
| | II) ब वर्ग | १९०० |
| वसुल भागभांडवल | | २६००५७५०.०० |
| एकूण राखीव व इतर निधी | | ४००३१७०.७९ |
| ठेवी | I) बचत ठेव | ६८३७१२२८.३३ |
| | II) चालू ठेव | ११२०८६२.१९ |
| | III) मुदत व इतर ठेवी | २६४३३२६१४.७७ |
| दिलेली कर्ज | I) सुरक्षीत | २२१७५२८५७.९७ |
| | II) असुरक्षीत | २३४५८८५.७० |
| | एकूण टक्केवारी अग्रक्रम क्षेत्रासाठी | ९३.३८% |
| | एकूण टक्केवारी दुर्बल घटकासाठी दिलेली कर्ज | ८९.५३% |
| गुंतवणूक | दि. सातारा जिल्हा मध्य.सह.बँक लि.सातारा, स्टेट बँक ऑफ इंडिया, आय.डी.बी.आय व इतर बँक | |
| | मुदत ठेव | २०४०६४७८.०० |
| | सरकारी कर्ज रोखे | ६३५५३७५३.०० |
| | DCC शेअर्स | ५००.०० |
| थकबाकी | | ४.०२% |
| NPA | | २.८७% |
| ऑडीटवर्ग | | |
| वार्षीक नफा | | १८१५९००.०९ |
| एकूण कर्मचारी | अधिकारी - १४ | |
| | लिपीक - ६ | |
| | शिपाई - ० | |
| शाखा | शाखा - ६ | |
| | विस्तारीत कक्ष - ० | |
| खेळते भांडवल | | ३७३३१५११३०.७९ |

# रिझर्व्ह बँक परिपत्रकानुसार दर्शविणेची माहिती

| अ. नं. | तपशिल | ३१/०३/१० | ३१/०३/११ |
|---|---|---|---|
| १ | स्वनिधी परिपूर्णता प्रमाणक (सी. आर. ए. आर.) | १८.९५% | १८.४६% |
| २ | ढोबळ एन. पी. ए. कर्ज रक्कम | ६६.४६ | ८६.२३ |
| ३ | ढोबळ एन. पी. ए. कर्ज एकूण कर्जाशी शेकडा प्रमाण | ४.३०% | ३.८५% |
| ४ | निव्वळ एन. पी. ए. कर्ज रक्कम | ३५.८९ | ६०.११ |
| ५ | निव्वळ एन. पी. ए. कर्जाशी शेकडा प्रमाण | ३.२६% | २.७१% |
| ६ | १) एन. पी. ए. तरतूद | २०.१५ | २६.१२ |
| | २) नियमीत कर्जाबाबत तरतूद | ३.४४ | ८.५९ |
| ७ | सरकारी रोखे गुंतवणूकीची रक्कम | २७७.९९ | ६३५.५४ |
| ८ | निव्वळ नफ्याचे सरासरी खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | ०.३७% | ०.५९% |
| ९ | इतर उत्पन्नाचे सरासरी खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | ०.८१% | ०.२७% |
| १० | व्याज उत्पन्नाचे सरासरी खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | १३.११% | ११.८५% |
| ११ | व्यवस्थापकीय खर्चाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | ४.८०% | ३.७६% |
| १२ | १) प्रती सेवक व्यवसाय | १३८.७९ | २७८.९६ |
| | २) प्रती सेवक नफा | ०.२६ | ०.९१ |
| १३ | सरकारी रोखे गुंतवणूकीचे एन. डी. टी. एल. शी प्रमाण | १४.६०% | २५.२३% |
| १४ | सरासरी येणे कर्जाचे सरासरी ठेवीशी शेकडा प्रमाण | ६६.४२% | ६९.७३% |
